जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
**E-Mail ID** : crimepress.pune@gov.in **Ph**.020 / 26122478

**प्रेसनोट क्रमांक - ७०** **दिनांक - २५/०१/२०२४**

पी.सी.बी.गुन्हे शाखा,पुणे शहर

## पर्वती पोलीस ठाणे परिसरात दहशत माजविणा-या, अट्टल गुन्हेगारावर मा.पोलीस आयुक्त, पुणे शहर यांची एम.पी.डी.ए. कायद्यान्वये स्थानबध्दतेची कारवाई

पुणे पोलीस आयुक्तालयातील पर्वती पोलीस स्टेशनचे हद्दीमध्ये गुन्हे करणारा अट्टल गुन्हेगार नामे **शुभम प्रमोद शिंदे,वय २६ वर्ष,रा.गल्ली नं.३८,मध्यवर्ती मंडळा जवळ, जनता वसाहत, पुणे** हा अभिलेखावरील सराईत गुन्हेगार आहे. त्याने साथीदारांसह विश्रामबाग व पर्वती पोलीस स्टेशनच्या हद्दीत चाकु, कोयता या सारख्या जीवघेण्या घातक हत्यारांसह खुनाचा प्रयत्न, दुखापत, बेकायदेशीर हत्यार बाळगणे यासारखे गंभीर स्वरुपाचे गुन्हे केले आहेत. **त्याचेविरूध्द ०२ गंभीर गुन्हे दाखल आहेत**. त्याच्या गुन्हेगारी कृत्यांमुळे सदर परिसरातील सार्वजनिक सुव्यवस्थेस बाधा निर्माण झालेली होती. तसेच त्याच्यापासून जीविताचे व मालमत्तेचे नुकसान होईल या भितीमुळे नागरिक उघडपणे तक्रार करणेस धजावत नव्हते.

प्राप्त प्रस्ताव व सह कागदपत्रांची पडताळणी करुन **मा.पोलीस आयुक्त, पुणे शहर श्री. रितेश कुमार, यांनी नमूद इसमाचे विरुध्द एम.पी.डी.ए. कायद्यान्वये नागपूर मध्यवर्ती कारागृह, नागपूर येथे १ वर्षाकरीता स्थानबध्दतेचे आदेश पारीत केले आहेत.** नमूद इसमास स्थानबध्द करण्यामध्ये श्री.नंदकुमार गायकवाड, वरिष्ठ पोलीस निरीक्षक,पर्वती पोलीस स्टेशन पुणे व श्री. चंद्रकांत बेदरे,वरिष्ठ पोलीस निरीक्षक,पी.सी.बी. गुन्हे शाखा, पुणे शहर यांच्या आधिपत्याखाली पोलीस अधिकारी व पोलीस अंमलदार यांनी सदरची कामगिरी पार पाडली.

मा.पोलीस आयुक्त,पुणे शहर यांनी कडक प्रतिबंधक कारवाई करण्याचे धोरण अवलंबिले आहे**. त्यांनी दहशत निर्माण करणा-या व सक्रिय अट्टल गुन्हेगारांवर एम.पी.डी.ए.कायद्यान्वये स्थान बध्दतेच्या ९६ कारवाया केल्या आहेत.** यापुढेही सराईत व अट्टल गुन्हेगारांचे कृत्यांना आळा घालण्या साठी प्रभावी प्रतिबंधक कारवाई करण्यात येणार आहे.